## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नवीन शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्रातील परीक्षा पुढील आठवड्यात सुरु होत असून त्या पार्श्वभूमीवर कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना खुले पत्र दिले आहे. त्यामध्ये सातत्यपूर्ण व नियोजनबध्द अभ्यास हीच तणावमुक्त परीक्षेची गुरूकिल्ली आहे मात्र कोणताही ताण न घेता परीक्षा देण्याचे आवाहन केले आहे.

या पत्रात प्रा. माहेश्वरी म्हणतात की, शैक्षणिक यश प्राप्त करण्याच्या मार्गातील परीक्षा हा महत्वाचा टप्पा आहे. तुम्ही अभ्यासासाठी घेतलेली मेहनत, केलेले नियोजन आणि पहिल्या दिवसापासून तासिकांना दिलेली उपस्थिती, शिक्षकांशी केलेला संवाद – चर्चा जर चोखपणे पार पाडल्या असतील तर परीक्षेची चिंता करण्याचे कोणतेही कारण नाही. कारण सातत्यपूर्ण व नियोजनबध्द अभ्यास हीच तणावमुक्त परीक्षेची गुरूकिल्ली आहे. काही अडचणींमुळे अभ्यासात तुम्ही मागे पडला असाल किंवा अन्य काही समस्या असतील तर शिक्षक, पालक, जवळचे मित्र यांच्याशी संवाद साधा. परीक्षा ही आपल्या जीवनातील शेवटची संधी असा विचार अजिबात करू नका. अभ्यास आणि परीक्षा यांचा ताण घेवून कोणत्याही चुकीच्या मार्गाचा अवलंब करू नका. कॉपीमुळे आपण यशस्वी होवू शकत नाही, उलट स्वत:चे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आणत आहात. परीक्षेचे मूल्यमापन ही गोपनिय प्रक्रिया आहे. त्यामुळे उत्तर पत्रिकेवर उत्तरे लिहितांना कोणत्याही चिन्हांचा किंवा ओळखदर्शक खुनांचा वापर करू नये. परीक्षांसाठी तणावमुक्त, निर्भय वातावरण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ नेहमीच प्रयत्नशील असल्याचे या पत्रात कुलगुरूंनी नमूद केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या एम. फार्मसी परीक्षेच्या फार्माकोलॉजी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास स्व. अण्णासाहेब रमेश अजमेरा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुवर्णपदक दिले जाणार असून त्यासाठी धुळे चॅरिटेबल सोसायटीचे अध्यक्ष आशिष अजमेरा यांच्या वतीने कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्याकडे रू. २ लाख १० हजार रूपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

आशिष अजमेरा यांच्या वतीने शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर रोजी हा धनादेश कुलगुरूंकडे देण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, अण्णासाहेब रमेश अजमेरा फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ उपस्थित होते.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ४ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतील महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने नंदुरबार येथील विद्यापीठ संचलित आदिवासी अकादमी येथे गांधी विचार व श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन दि. ३ ऑक्टोबर रोजी करण्यात आले.

या शिबिरात १६० विद्यार्थी सहभागी झाले होते. अधिसभा सदस्य डॉ.जयंत उत्तरवार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प संचालक चंद्रकांत पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या शिबिरात गांधीवादी नेते व ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक डॉ.पितांबर सरोदे, डॉ.माधव कदम हे प्रमुख वक्ता म्हणुन उपस्थित होते. अकादमीचे प्रभारी संचालक प्रा.किशोर पवार, व रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे हे दोन विविध सत्रांच्या अध्यक्षस्थानी होते.शिबीराची सुरुवात श्रमदानाने करण्यात आली. डॉ.जयंत उत्तरवार यांनी महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज व खेड्याकडे चला या भुमिकांवर मार्गदर्शन केले. गांधीजींचे साहित्य व त्यातील विचार यावर डॉ. पितांबर सरोदे यांनी भुमिका मांडतांना तरुण पिढीने गांधी विचार अंगी बाळगण्याचे आवाहन केले. डॉ. माधव कदम यांनी द्वेष व हिंसा यामुळे समाज पोखरला जात असून गांधी विचार हाच जगाला तारणारा असल्याचे सांगितले.प्रा. किशोर पवार व डॉ.सचिन नांद्रे यांनीही मनोगत व्यक्त केले.

नंदुरबार येथील जीटीपी महाविद्यालय, विधी महाविद्यालय, जिजामाता महिला महाविद्यालय, बी.एड कॉलेज, काकासाहेब हिरालाल चौधरी महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी हे विद्यार्थ्यांसह सहभागी झाले होते. या शिबिरात घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत एस्तेर वळवी प्रथम, साईराज माळी द्वितीय, व चिन्मय अग्निहोत्री तृतीय विजेते ठरले. निबंध स्पर्धेत सुमित्रा वसावे प्रथम, शिवली पाडवी द्वितीय व मोहिनी नवरे तृतीय आले. पोस्टर स्पर्धेत रिता सुळे प्रथम,साक्षी वसावे द्वितीय व एस्तेर वळवी तृतीय विजेते ठरले. विजेत्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गांधी केंद्राचे प्रमुख डॉ. उमेश गोगडीया यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन प्रा.स्मिता देशमुख व एस्तेर वळवी यांनी केले. प्रा.हर्षल चौरे यांनी आभार मानले. आदिवासी अकादमीतील समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

बातमी क्र. २

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला सेंटर फॉर रिसर्च इन स्किम्स ॲ ण्ड पॉलिसिज च्या समन्वयक अनामिका नायर यांनी भेट देऊन विविध प्रशाळांचे संचालक व प्राध्यापकासोबत चर्चा केली. कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांची देखील त्यांनी भेट घेतली. बीकॉम. बीएफएसआय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसोबतही त्यांनी संवाद साधला. शिक्षकांच्या येणाऱ्या अडचणी त्यांनी जाणून घेतल्या.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ४ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी